(11)

जा.क्र.माध्य-२/प्रथम मान्यता/पुणे/ १४२४
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१. यांचे कार्यालय,
दिनांक :- 21 JUL 1998

प्रति,

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे

विषय :- प्रथम मान्यता

श्रीम. कमलादेवी गोविंदशेठ सावळे इंग्लिश मेडीयम स्कूल, आकुर्डी

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ह-४/प्र.मा/९७-९८.
दिनांक - ५/६/९८.

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२,३.३ अन्वये पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, एरंडवणा. संस्थेच्या श्रीमती कमलादेवी गोविंदशेठ सावळे इंग्लिश मेडीयम स्कूल आकुर्डी माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८ वी/ ९ वी/१० वी च्या वर्गास १९९६/१९९७ या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९६ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे यांची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे या बाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिक दृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करून द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षीत शिक्षक वर्ग उपलब्ध करून द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करून द्यावी.
८] वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करून घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्यावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.
१३] पुरेसे विद्यार्थी संख्या असावी.
१४] अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर असावा.
१५] प्राथमिक व माध्यमिक साठी स्वतंत्र शिक्षकवर्ग असावा.
१६] विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमात सहभाग असावा.

प्रति, मुख्याध्यापक श्रीमती कमलादेवी गो. सावळे इंग्लिश मेडीयम स्कूल, आकुर्डी

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे

HEADMASTER
Pune District Education Association's
English Medium Secondary School,
Sector No. 28, Akurdi, Pune - 411 044.

HEADMAST
Pune District Educatio
English Medium Seco
Sector No. 28, Akurdi,

PRINCI
PDEA's English Medium
& Jr. Col
Sector No. 28, Akurdi